# MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDYALAYA, DARWHA

## Session 2023-24

**3.2.2 Number of workshops/seminars conducted on Research Methodology, Intellectual Property Rights (IPR) and entrepreneurship during the year**

| Year | Name of the workshop/ seminar | Number of Participants |
|---|---|---|
| **2023-24** | One day State Level Workshop on Techniques of Data Collection | 110 |




*Brochure of Workshop*




*Dr.V.B.Raut while inaugurating the Workshop*




*Prof.Dr.Balasaheb Jogdand while guiding the Students*




*Prof.S.B.Chakave interacting with Students*




*Students attending the Workshop*



नवराष्ट्र

# वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करणे आवश्यक

## डॉ. सुनील चकवे ; मुंगसाजी महाराज महाविद्यालयात संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

दारव्हा (ता.प्र.). दिवसेंदिवस सामाजिक प्रश्न जटील आणि गुंतागुंतीचे बनत चालले आहे. मानव त्याबाबतचे ज्ञान संपादन करण्याकरिता नेहमीच प्रयत्नशील असतो. परंतु ते ज्ञान, वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक मार्गाने प्राप्त करणे आवश्यक असते. त्यासाठी संशोधनाची आवश्यकता असते, असे मार्गदर्शन कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये सर्वप्रथम, संशोधन पद्धतीवर डॉ. सुनील चकवे यांनी केले.

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयात सोमवारी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातील पदव्युत्तर शाखेतील विद्यार्थ्यांकरिता पदव्युत्तर विभाग आणि आय. क्यू. ए. सी. मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केले होते. या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख बाळासाहेब जोगदंड उपस्थित होते. त्यांनी तथ्य संकलनाची तंत्रे या विषयावर पदवीत्तर मराठी, राज्यशास्त, समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, गृहअर्थशास्त्र तसेच वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, संगणक शास्त्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य विलास राऊत होते. प्रास्ताविक सुनील चकवे यांनी तर संचालन डॉ. नाझिया रशिदी यांनी केले. उपस्थितांचे आभार प्राध्यापक प्रियंका रुईकर यांनी मानले.

### आजचे युग संशोधनात्मक

प्रमुख वक्ते डॉ. बाळासाहेब जोगदंड यांनी संशोधनाकरिता तथ्य संकलनाची तंत्र या विषयावर विशेष प्रकाश टाकला. आजचे युग हे संशोधनात्मक युग आहे व त्याचा जवळून परिचय उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांना होणे फार आवश्यक आहे, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. द्वितीय सत्राच्या अध्यक्षस्थानी गणित विभाग प्रमुख डॉ. यादव सोळके होते. या सत्रात आभार डॉ.खुशाल ढवळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. संदीप भुरले, विकास पाईकराव व महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांनी हिरीरीने सहभाग नोंदविला.या कार्यशाळेचे आयोजन उपप्राचार्य डॉ. सुनील चकवे यांनी केले होते.

Yavatmal Edition
01 November 2023 Page No. 3
epaper.navarashtra.com



देशोन्नती

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

दारव्हा ■ स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयात दिनांक ३० ऑक्टोबर ला एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातील पदव्युत्तर शाखेतील विद्यार्थ्यांकरिता पदव्युत्तर विभाग आणि आय. क्यू. ए. सी. मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित केले होते. या कार्यशाळे करिता प्रमुख वक्ते म्हणून बाळासाहेब जोगदंड राज्यशास्त्र विभाग प्रमुख एस. ए. महाविद्यालय अकोला हे उपस्थित होते त्यांनी तथ्य संकलनाची तंत्रे या विषयावर पदवीत्तर मराठी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास अर्थशास्त्र, गृहअर्थशास्त्र तसेच वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, संगणक शास्त्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आधुनिक शिक्षण पद्धतीचा कल हा संशोधनात्मक पद्धतीकडे असून पदव्युत्तर शिक्षणांमध्ये या विषयाला नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अनिवार्य केलेले आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना हा विषय अगदी जवळून समजावा आणि सोपा करून विद्यार्थ्यांच्या पुढ्यात ठेवावा हाच एकमेव उद्देश या कार्यशाळेचा होता.

या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य विलास बी राऊत हे होते तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील चकवे यांनी केले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नाझिया रशिदी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. कु. प्रियंका रुईकर यांनी मांनले.

या कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये सर्वप्रथम, संशोधन पद्धतीवर डॉ. सुनील चकवे यांनी मार्गदर्शन केले . प्रमुख वक्ते डॉ. बाळासाहेब जोगदंड यांनी संशोधना करिता तथ्य संकलनाची तंत्र या विषयावर विशेष प्रकाश टाकला.

या द्वितीय सत्राचे अध्यक्षस्थानी गणित विभाग प्रमुख डॉ. यादव सोळके होते तर या आभार डॉ. खुशाल ढवळे यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता डॉ. संदीप भुरले, विकास पाईकराव व महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांनी हिरीरीने सहभाग नोंदवला. (श.प्र.)

Deshonnati Edition
Oct 31, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com

*News of the Workshop in Navrashtra and Deshonnati Newspaper*




Principal
Mungsaji Maharaj Mahavidyalay
Darwha Dist.Yavatmal